## विशेष ▶▶



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या ५५४ विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक : प्रतिनिधी**

उच्च दर्जाचे तंत्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्लेसमेंट क्षेत्रात विक्रमी यश संपादन केले आहे. यावर्षी महाविद्यालयातील ५५४ विद्यार्थ्यांची निवड नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे झाली आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी २५० मुली आणि ३०४ मुले असून, त्यांना सरासरी वार्षिक साडेपाच लाख रुपयांचे पॅकेज प्राप्त झाले आहे. या वर्षभरात सुमारे २०० हून अधिक कंपन्यांनी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. आयटी क्षेत्रातील झेन्सार, फिनिक, जोश सॉफ्टवेअर, पे-यू, टीसीएस, फॉक्स सोल्यूशन्स, अरेस सॉफ्टवेअर यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांसह एबीबी, महिंद्रा अँड महिंद्रा, रिलायन्स, श्नाइडर इलेक्ट्रिक, बर्न्स अँड मॅकडोनेल, इमर्सन यांसारख्या कोअर क्षेत्रातील कंपन्यांनीही विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यावर्षी आयटी कंपन्यांबरोबरच कोअर क्षेत्रातील कंपन्यांमध्येही उल्लेखनीय प्लेसमेंट झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली.

**Gavkari 04-07-2026**